# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जा.क्र. जिपना/ग्रापं -१/३७१२/२०२४ दिनांक 27 SEP 2024

=====================================================================

प्रति,

सोबत ७६ उमेदवारांची यादी

विषय : जि.प.नांदेड अंतर्गत गट-क मधील कंत्राटी ग्रामसेवक या पदाच्या सरळसेवा पदभरती २०२३. मूळ शैक्षणिक / व्यावसायिक / अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणी करिता दि. ०१.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ :

१ कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी IBPS कंपनी मार्फत ऑनलाईन घेण्यात आलेली परीक्षा दि. २५,२९, ३०/०७.२०२४ व दिनांक २८.०८.२०२४

२ IBPS कंपनी मुंबई यांचे कडून कंत्राटी ग्रामसेवक या पदाची जिल्हा परिषद नांदेड कडे प्राप्त झालेली एकत्रित गुणवत्ता यादी.

३ जि.प नांदेड कडून कंत्राटी ग्रामसेवक या पदाच्या भरती २०२३ करिता दिनांक १४.०९.२०२४ रोजी प्रसिद्ध केलेली एकत्रित गुणवत्ता यादी.

४ जिल्हा निवड समितीच्या मान्यतेने दि. २७.०९.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणी साठी बोलवावयाच्या उमेदवारांची यादी

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, जिल्हा परिषद नांदेड सरळसेवा पदभरती 2023 अंतर्गत **कंत्राटी ग्रामसेवक** या पदाची ऑनलाइन परीक्षा दि. २५,२९, ३०/०७.२०२४ व दिनांक २८.०८.२०२४ रोजी घेण्यात आली आहे. संदर्भ क्र.०२ अन्वये IBPS कंपनी कडून प्राप्त निकाल संदर्भ क्र. ०३ अन्वये जिल्हा परिषदेच्या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ०४ अन्वये प्रवर्ग निहाय गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणी साठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर यादीतील उमेदवारांची कंत्राटी ग्रामसेवक या पदाच्या पदभरती साठी मूळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व कागदपत्रे/ दस्ताऐवज तपासणी/ पडताळणी **दि.०१.१०.२०२४ (मंगळवार) रोजी सकाळी 11.00 वाजता, कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड** येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण मूळ कागदपत्रे तपासणी साठी आवेदन पत्राची प्रत तसेच जाहिरातीमधील परिच्छेद क्र.19 मध्ये नमूद केलेली व **कंत्राटी ग्रामसेवक** पदासाठी आवश्यक असलेली सर्व मूळ शैक्षणिक / व्यावसायिक / अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे व त्याची एक साक्षांकित प्रतीसह **दि.०१.१०.२०२४ (मंगळवार) रोजी सकाळी 11.00 वाजता, कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड** येथे न चुकता उपस्थित राहावे. मूळ कागदपत्रे/दस्ताऐवज पडताळणी करिता गैरहजर राहिल्यास गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिया संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**मा.अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी नांदेड यांच्या मान्यतेने /-**

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती नांदेड तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.)**
**जिल्हा परिषद नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

१) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड. यांना माहितीस्तव सादर.
३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) जिल्हा परिषद नांदेड. यांना माहितीस्तव सादर.

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती नांदेड तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.)**
**जिल्हा परिषद नांदेड**

Scanned with OKEN Scanner

**जिल्हा परिषद नांदेड सरळसेवा पदभरती २०२३**

**जिल्हा परिषद नांदेड कडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या कनिष्ठ सहाय्यक या पदासाठी गुणानुक्रमे बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्राची यादी**

| अ.क्र | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा. |
| २ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४ | वयाचा पुरावा |
| ५ | जन्माचा पुरावा |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ७ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जात पडताळणी प्रमाणपत्र. |
| ८ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करणेच्या दिनांकास वैध असलेले) |
| ९ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १० | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११ | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १३ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र |
| १८ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २० | अनुभव प्रमाणपत्र |
| २१ | नावातील बदला बाबत प्रमाणपत्र / शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २३ | छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, वाहन परवाना पुरावा, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे ओळखपत्र |
| २४ | उमेदवार शासकिय कर्मचारी असल्यास नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेले परवानगी पत्र |

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती नांदेड तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.)**
**जिल्हा परिषद नांदेड**

Scanned with OKEN Scanner